N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव
**P.S.(ठाणे):** कासोदा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0085
**Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/05/2025 16:25

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Date From (दिनांक पासून):** 08/01/2025
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/01/2025
**Time From (वेळेपासून):** 11:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/05/2025 **Time (वेळ):** 16:16 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 008
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/05/2025 16:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 09 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** श्री संत हरिहर महाराज , माध्यमिक विद्यालय, निपाणे,एरंडोल

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** किशोर धर्मराज पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | निपाणे ,एरंडोल,कासोदा,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | निपाणे ,एरंडोल,कासोदा,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9970754563

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संदिप प्रभाकर महाजन | | | 1. सत हरिहर महाराज माध्यमिक विद्यालय, निपाणे,एरंडोल, कासोदा,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

कासोदा पोलीस स्टेशन,भाग सिसीटीएनस न.85/2025गुरनं भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे
पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्याची माहिति
फिर्यादी-किशोर धर्मराज पाटील, वय 33, व्यवसाय नोकरी,रा.निपाणे ता.एरंडोल जि.जळगाव
आरोपी - संदिप प्रभाकर महाजन, वय 45 वर्ष व्यवासय मुख्याध्यापक श्री. संत हरिहर महाराज माध्यमिक विद्यालय, निपाणे, ता.एरंडोल, जि. जळगाव (खाते माध्यमिक शिक्षण विभाग, वर्ग-3)
गुन्हा.घडला ता.वेळ व ठिकाण – दिनांक 08/01/2025 रोजी 11.00 ते 12.45 वाजेचे दरम्यान श्री. संत हरिहर महाराज माध्यमिक विद्यालय, निपाणे, ता. एरंडोल येथे
लाच मागणीची रक्कम – तडजोडी अंती -3,600/- रु
सापळा व तपास अधिकारी - योगेश ठाकुर पोलीस उपअधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव
गुन्हयाची थोडक्यात हकीगत - यातील फिर्यादी हे श्री. संत हरिहर महाराज माध्यमिक विद्यालय, निपाणे ता. एरंडोल, जि. जळगांव येथे शिपाई सेवक पदावर नोकरी आहेत.फिर्यादी यांनी त्याची पत्नी सौ.अर्चना यांचेवर झालेल्या वैधकीय उपचाराचे 23,815/- रुपयाचे मेडीकल बिल मंजुरी करीता दिनांक 11/12/2024 रोजी आलोसे यांचेकडे सादर केले होते तेव्हा आलोसे यांनी फिर्यादीस सदरचे मेडीकल बिल हे त्यांचे ओळखीने सिव्हील हॉस्पीटल जळगाव व वेतन अधिक्षक माध्यमिक शिक्षण विभाग जळगाव येथे मंजुर करुन आणुन देतो असे सांगुन 5,000/- रुपयेची लाचेची मागणी केली होती त्याबाबत फिर्यादी यांनी दि.21/12/2024 रोजी ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती.

सदर तक्रारीची दि.21/12/2024 , दि.08/01/2025,दि.15/01/2025 रोजी पडताळणी केली असता वर नमुद आलोसे यांनी फिर्यादीची पत्नी सौ,अर्चना हिचे 23,815/-रुपयाचे मेडीकल बिल त्यांचे ओळखीने सिव्हील हॉस्पीटल जळगाव व वेतन अधिक्षक माध्यमिक शिक्षण विभाग जळगाव येथुन मंजुर करुन आणुन देतो असे भासवुन त्यासाठी 13 टक्के ची पावती फाडावी लागते, नतंर ते बिल शिक्षण अधिकारी यांचेकडे जाते असे सांगुन 12 टक्के हे घेता 2 ते 3 टक्के ते घेता असे बोलुन तडजोडीअंती फिर्यादीकडे स्वतासाठी सदर मेडीकल बिलाच्या 23,815 /- रुपये रक्कमेच्या 15 टक्के प्रमाणे 3,600/-रुपये लाच रक्कमेची मागणी केली म्हणु गुन्हा सोबत टंखलिकीत केलेली फिर्याद जोडली असुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपअधिक्षक योगेश ठाकुर अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव हे करीत आहे.
दाखल अमलदार पोना/1618प्रदीप आप्पासाहेब पाटील नेम कासोदा पोलीस स्टेशन

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
(KISHOR Ramdas PATIL) पो.उप.अधिक्षक योगेश ठाकूर, ला.लु.प्र.वि. जळगांव.
**Rank (पद):** PC (Police Constable) **No.(क्र.):** PCMH84059
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge,**
**Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-य**
पो. ठाणे अंमलदार
पो. स्टे
**Name (नाव):** Nilesh Divansing Ra
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 1510100402NDWM830

<u>फिर्याद</u>

कासोदा पो.स्टे.,जळगाव
दि.२९.०५.२०२५

मी किशोर धर्मराज पाटील, वय—३४, व्यवसाय नोकरी, रा.निपाणे, ता.एरंडोल, जि.जळगांव, मो.नं. ९९७०७५४५६३.

समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरिल ठिकाणी पत्नी सौ.अर्चना व मुलाबाळांसह राहत असुन श्री.संत हरिहर महाराज माध्यमीक विद्यालय, निपाणे,ता.एरंडोल येथे सन २०१८ पासून शिपाई पदावर कार्यरत आहे. माझी पत्नी सौ.अर्चना हिचेवर झालेल्या वैद्यकीय उपचाराचे २३८१५/— रुपयांचे मेडीकल बिल मंजुरी करिता मी दि.११.१२.२०२४ रोजी आमचे शाळेचे मुख्याध्यापक श्री.संदिप महाजन यांचेकडे सादर केले होते. तेव्हा त्यांनी मला सदरचे मेडीकल बिल हे सिव्हील हॉस्पीटल जळगांव व वेतन अधिक्षक माध्यमिक शिक्षण विभाग जळगांव येथे ओळख असुन यांच्याकडुन मंजुर करुन आणुन देतो असे सांगुन ५०००/—रुपये लाच रक्कमेची मागणी केली होती. सदर लाचमागणी प्रकारा बाबत मी दि.२१.१२.२०२४ रोजी जळगाव लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे पोलीस उप अधीक्षक श्री.योगेश ठाकूर यांचेकडे सापळा पथका समक्ष तक्रार लिहुन दिली होती.

मी, वर प्रमाणे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.२१.१२.२०२४ रोजी लाचमागणी पडताळणी कारवाईकामी व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते माझेकडेस देवुन मला मुख्याध्यापक श्री. संदीप महाजन यांची भेट घेण्यासाठी श्री.संत हरिहर महाराज माध्यमिक विद्यालय, निपाणे येथे पंच श्री.कासारे यांचेसह माझ्या मोटर सायकलने सोनबर्डी फाटया जवळुन पाठवण्यात आले होते. त्याप्रमाणे मी व पंच श्री.कासारे असे तेथे जावुन मुख्याध्यापक श्री.महाजन यांना भेटलो. तेव्हा त्यांचेत व माझेत माझ्या पत्नीचे मेडीकल बिल मंजुरीचे कामा विषयी चर्चा झाली. परंतु त्या दरम्यान त्यांनी मला पुढच्या आठवडयात मार्ग नक्की काढुन देतो असे सांगीतल्याने व त्यांचेकडुन लाच मागणीबाबत स्पष्टता न झाल्याने सदर दिवशीची सापळा कारवाई स्थगीत करण्यात आली होती.

त्यानंतर दि.०८.०१.२०२५ रोजी झालेल्या सापळा कारवाई दरम्यान लाचमागणी पडताळणी कारवाईकामी व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझेकडेस देवुन, मला व पंच क्र.१ कासारे यांचे सोबत मुख्याध्यापक श्री.संदिप महाजन यांची भेट घेण्यासाठी श्री.संत हरिहर महाराज माध्यमिक विद्यालय, निपाणे येथे पाठविले होते. त्या दरम्यान आमच्या दोघांमध्ये माझ्या पत्नीचे २३८१५/—रुपयांचे मेडीकल बिल मंजुरीचे कामा बाबत चर्चा झाली. सदर चर्चे दरम्यान त्यांनी मला सिव्हील हॉस्पीटल जळगांव येथे १३ % ची पावती फाडावी लागते, नंतर ते बिल शिक्षण अधिकारी यांचेकडे जाते, ती फाईल सिनिअर अधिकारी आणु असे सांगुन, १२ % हे घेता २ ते ३ ते घेता असे बोलुन तडजोडीअंती सदर मेडीकल बिलाच्या एकुण रकमेच्या १५ % प्रमाणे ३६००/—रूपये लाच रक्कमेची मागणी करुन, सदर लाच रक्कम माझे तर्फे बापू मिस्तरी यांच्याकडुन स्विकारण्याचे मान्य केले होते.

त्याप्रमाणे मी त्यांना माझे गुरु बंधु श्री.बापु मिस्तरी,रा.निपाणे यांचेकडुन **''चालु पुरता २,५००/— रुपये घेवुन घ्या, नंतर १,०००/— रुपये त्यांचेकडे देवुन देईल''** असे सांगीतले असता त्यांनी **''मागुन घेईल मी देवुन टाक''** असे सांगुन माझेतर्फे बापु मिस्तरी यांचे कडुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले होते. परंतु बापू मिस्तरी हे माझे गुरुबंधु असल्याने व सदर लाचेच्या रक्कमेशी त्यांचा कोणताही संबध नसल्याने मला लाच रक्कम त्यांच्याकडे देवुन त्यांना लाचेच्या गुन्हयात अडकावयचे नव्हते. म्हणून मी त्यांच्याकडे लाचेची रक्कम दिली नाही. मुख्याध्यापक श्री.संदीप महाजन हे स्वत: माझेकडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत म्हणुन सदर दिवशी सापळा कारवाई स्थगित करण्यात आली होती.

त्यानंतर दि.१५.०१.२०२५ रोजी झालेल्या कारवाई दरम्यान मी सापळयाकामी १,०००/—रूपये दिले होते. सदर नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावण्याचे प्रात्यक्षीक करुन दाखवुन ते माझ्या शर्टाच्या डाव्या

कासोदा पो.स्टे.
गु.र.नं.: 85/2025
भ्र.प्र.अ. 1988
चे कलम 7
प्रमाणे
दि. 29.05.25
16/16 वा.
दाखल केला.
(सही)
पो.ठाणे अंमलदार
कासोदा पो. स्टे

(सही)

(सही) उपाधीक्षक 29/5/2

खिश्यात ठेवुन दिले होते. व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून माझेकडे देवुन, मला व पंच श्री.कासारे अशांना सदर लाच रक्कम मुख्याध्यापक श्री.संदीप महाजन यांना देण्यासाठी माझ्या मोटर सायकलने श्री.संत हरिहर महाराज माध्यमिक विद्यालय,निपाणे ता.एरंडोल जि.जळगांव येथे पाठविले होते. तेव्हा मी मुख्याध्यापक श्री.संदीप महाजन यांना **''१०००/– बापू कडे देवु का तुम्ही घेता''** असे विचारले असता त्यांनी **''मागुन घेईल मी देवुन टाक''** असे सांगुन माझेकडुन लाच रक्कम स्विकारण्यास नकार दिला. म्हणुन सदर दिवशी सापळा कारवाई स्थगित करण्यात आली होती.

यापुर्वी जुन २०२४ मध्ये देखील मुख्याध्यापक श्री.संदिप महाजन यांनी माझे वेतन निश्चीतीच्या फरकाची २,५३,७८०/–रुपयांची रक्कम वेतन अधिक्षक माध्यमीक विभाग जळगाव यांचेकडुन मंजुर करुन दिल्याचा मोबदला म्हणुन सदर रकमेच्या ५ % प्रमाणे माझेकडे १२,५००/–रुपये लाचेची मागणी केल्या प्रकरणी त्यांच्यावर मी कासोदा पोलीस स्टेशन येथे गुरनं.१०५/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अ प्रमाणे दि.२७.०६.२०२४ रोजी गुन्हा दाखल आहे. त्यामुळे ते माझे पत्नीचे मेडीकल बिल त्यांचे ओळखीने सिव्हील हॉस्पीटल जळगांव व वेतन अधिक्षक माध्यमिक शिक्षण विभाग जळगांव येथुन मंजुर करुन आणुन देण्याचे प्रकरणी स्वत: माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत अशी माझी खात्री झाल्याने पुढील सापळा कारवाई थांबवण्यात आली होती. सदर लाचमागणी प्रकरणी त्यांचेवर कारवाई होणेकामी मी दि.१८.०३.२०२५ रोजी सविस्तर जबाब दिलेला होता.

तरी दि.२१.१२.२०२४, दि.०८.०१.२०२५, दि.१५.०१.२०२५ रोजी वर प्रमाणे झालेल्या सापळा कारवाई दरम्यान श्री.संदीप प्रभाकर महाजन,मुख्याध्यापक, श्री.संत हरिहर महाराज माध्यमीक विद्यालय, निपाणे,ता.एरंडोल जि.जळगाव यांनी माझी पत्नी सौ.अर्चना हिचे २३,८१५/– रुपयांचे मेडीकल बिल त्यांचे ओळखीने सिव्हील हॉस्पीटल जळगांव व वेतन अधिक्षक माध्यमिक शिक्षण विभाग जळगांव येथुन मंजुर करुन आणुन देतो. त्यासाठी १३ % ची पावती फाडावी लागते, नंतर ते बिल शिक्षण अधिकारी यांचेकडे जाते, असे सांगुन, १२ % हे घेता २ ते ३% ते घेता असे बोलुन तडजोडीअंती सदर मेडीकल बिलाच्या २३,८१५/–रुपये रकमेच्या १५ % प्रमाणे ३६००/–रूपये लाच रक्कमेची मागणी करुन, सदर लाच रक्कम माझे तर्फे माझे गुरुबंधु श्री.बापू मिस्तरी,रा.निपाणे,ता.एरंडोल यांच्याकडुन स्विकारण्याचे मान्य केले होते. म्हणुन माझी फिर्याद आहे.

समक्ष

**योगेश जी. ठाकुर**
**पोलीस उप अधिक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**

**ही फिर्याद दिली**
**दि.२९.०५.२०२५**

२९/५/२५